
९८६५
म. प्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६८७



# हिरवळ

REFBK-0014807
REFBK-0014807

संपादक
प्रा. सु. का. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38833 वि: काव्य
क्रमांक 9669 नों दि: 28/8/44

# हिरवळ

(काव्यसंग्रह)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 38000

पुरस्कार
प्रा. म. ना. अदवन्त

संपादक
प्रा. सु. का. जोशी

REFBK-0014807
REFBK-0014807

किंमत
दोन रुपये

वैभव प्रकाशन, पुणें २.

वैभव प्रकाशन : ३

प्रकाशक :
प्रा. सुधाकर के. भोसले,
'अस्मिता', ७१२ गुरुवार पेठ,
पुणे २.

© प्रा. सु. का. जोशी
१२११, पाटील बिल्डिंग
जिल्हा पेठ, जळगाव.

मुखपृष्ठ :
श्री. र. धों. राजहंस

प्रथमावृत्ति :
२६ जाने. १९६५

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन,
साधना प्रेस,
४३०–३१ शनवार पेठ,
पुणे २.

# स्वागत–

कॉलेजमध्ये शिकत असतांना प्रत्येकजण मनाने व वृत्तीने कवी असतोच. ते जीवन विविध मुग्ध भावनांनी इतके बहरलेले असते की, त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनांत काव्याची हिरवळ फुलावी. काहींचे काव्य मनांतल्या मनांत राहते– काहींचे काव्य शब्दरूप पावते. काहीजण या काळांत काव्य जगतात– काही काव्य लिहितात. शैशव व तारुण्य यांच्या सीमारेषेवर असलेले हे जग मोठे मधुर व रम्य असते. या वेळी मनांत स्वप्नाची सृष्टी बहरलेली असते– आणि त्यांतीलच काही स्वप्ने शब्दरूप घेऊन बाहेर पडतात. अशाच काही स्वप्नांचे मोहक दर्शन ‘ हिरवळींत ’ आपणाला आढळेल.

या स्वप्नांचे रंग वेगवेगळे असले तरी अस्फुट प्रीतीची चाहूल बहुतेक काव्यांतून ऐकू येते. हे वयच मुळी प्रीतीची वेडी स्वप्ने पहाण्याचे त्या स्वप्नात रंगण्याचे आणि स्वतःला विसरण्याचे. त्यामुळे ‘ हिरवळींत ’ प्रेमभावनेला बहर येणे अगदी स्वाभाविक आहे. कुठे एखाद्या काव्यांत एखादे ‘ गुपित ’ साकार झालेले दिसते तर कुणी प्रियतमेची ‘ चाहूल ’ कानावर येईना म्हणून तळमळताना आढळतो. एखाद्या काव्यांत मनाच्या जखमा उघड्या होऊन त्यांतील वेदनांचा कल्लोळ ऐकू येतो तर ‘ नाही चैन क्षणाचीही, मनीं वादळ भयाण ’ अशी कुणा कवीची आर्त अवस्था एखाद्या काव्यांत आढळते. प्रेमभावनेच्या अशा कितीतरी छटा ‘ हिरवळीं ’त अतिशय नाजूकपणे प्रगट झालेल्या आढळतील. या भावनांत प्रत्यक्ष अनुभूतीचा साक्षात्कार नसेल, पण तरुण मनाच्या स्वप्नांचा यांत गंध आहे– आणि त्यांत ताजेपणा आहे– अगदी हिरवळीइतका !

अगदी मोजक्या शब्दांत एखादी भावछटा साकार करण्याचे सामर्थ्य काही कवींच्या काव्यामध्ये दिसून येते. कु. मंगला नाडकर्णींची पुढील कविता पहा—

सांज आहे ओलावलेली
पापणींत रेंगाळणारी
आरस्पानी तळ्यामध्ये पाहून काजळ रेखणारी.

सांज आहे जडावलेली
किंचित् भुवई उंचावलेली
मऊशार हातावर लालचुटुक मेंदी रंगवणारी.

या सहाच ओळींमध्ये कवयित्रीने एक भाववृत्ती साकार केली आहे. प्रमोद पाटणकर यांची ' चाहूल ' ही कविता किंवा ' पावसाच्या सरींत ' ही कविता वाचत असताना मोजक्या व सूचक शब्दांत काही अस्पष्ट धूसर भाव व्यक्त करण्याचे त्यांचे कौशल्यही दिसून येते.

भावनाविष्कारांत ज्याप्रमाणे काही काव्यांत नाजूकता आणि सूचकता आहे त्याप्रमाणे काही काव्यांत उत्कटताही आहे. त्या कवितेतील भावनांचे रंग भडक असले तरी ते मनाला मोह पाडतात. त्या भडकपणांतही काहीसे निराळे सौंदर्य दिसू लागते. शशिकांत भावसार यांची ' वरिवरि हसलीस ' ही, कु. शैला पवारची ' मुखवटा ' ही, अ. बा. कुळकर्णी यांची ' गेलास सोडुनी कां ? ' ही किंवा कु. भावना हिची ' वेडे मन ' यासारख्या काही कवितांतून भावनांचे भडक रंग विशेष उठून दिसतात.

काही कवनांतून सुंदर निसर्गचित्रे आहेत तर पुष्कळांनी निसर्गाला आपल्या भावनांचे माध्यम केले आहे. रवींद्र मेढे यांची ' खडक ' कविता एक चांगल्यापैकी शब्दचित्र आहे. श्री. मा. देशपांडे याने केलेले ' हिरवा श्रावण ' या कवितेंतील निसर्गवर्णन परंपरागत असले तरी चांगले साधले आहे. पण शुद्ध निसर्गवर्णनाच्या गीतापेक्षा निसर्गाच्या माध्यमांतून भावछटा व्यक्त करण्यांत अनेक कवींनी चांगले यश मिळविले आहे. निसर्गाशी त्यांची भाववृत्ती साकार होते व ती त्या निसर्गाच्या वर्णनांतून सूचकतेने, अस्फुट आणि धूसर पद्धतीने व्यक्त होते. शशिकांत भावसार यांची ' सायंतारा ',

कु. मंगला नाडकर्णी हिची ' केव्हातरी ', एम्. एन्. अत्तरदे यांची ' शिशिर ', अ. बा. कुळकर्णी यांची ' उजाड झाली बाग ', कु. रत्ना बाबर हिची ' आश्विनी नेत्र ' अशासारख्या कवितांतून भावनाविष्कारासाठी निसर्गाचा उपयोग अतिशय कलात्मक रीतीने केलेला आढळेल.

या हिरवळींत इतरही अनेक रंग आहेत. ' लगिन ' ( र. धों. राजहंस ), भक्तिभाव ( र. वि. पंडित ), ' सैनिका, शस्त्र उचल ' ( भीमराव पाटील ), स्त्रीहट्ट ( कु. विद्या देशपांडे ), बिचारा ( विद्याधर पानट ) या कवितांचे उदाहरण देता येईल. कुठे ती आपणाला जानपद जीवनांत घेऊन जाते तर कुठे भारतभूमीच्या शूर सैनिकाला आदराञ्जली वाहते. कुठे ती आपल्या वेड्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करते तर कुठे ती स्मशानाचे वैराग्यही दाखविते. कुठे ती स्त्रीहट्टामुळे झालेले परिणाम रंगविते तर कुठे परमेश्वराबद्दलचा भक्तिभाव प्रगट करते.

पण या विविधरंगांतून उठून दिसतो तो प्रीतीचा रंग. तरुणमनांतील अनेक स्वप्नांचा मधुर गंध त्यांतून येतो– अस्फुट व मुग्ध भावना नाजूकपणे त्यांतून व्यक्त होते– आशा– निराशेची, उत्कंठेची, आर्ततेची चित्रे त्यांतून रंगविली जातात– त्यामुळेच त्या भावना आपल्या मनाला भुरळ पाडतात. तरुण मनाला आपल्या भावनांचं प्रतिबिंब त्यात दिसेल– प्रौढांना पुनःप्रत्ययाचा आनंद वाटेल.

म्हणूनच या हिरवळीचे मी मोठ्या प्रेमाने स्वागत करतो आणि या युवकांच्या स्वप्नांना असाच बहर यावा, त्याचा गंध सर्वत्र दरवळावा व सर्व रसिकांची मनं त्या गंधाने प्रमुदित व्हावींत अशी आशाही याच प्रसंगीं व्यक्त करतो.

**म. ना. अद्वन्त**

# निवेदन—


माझ्या तरुण मित्रांच्या निवडक कवितांचा ' हिरवळ ' हा प्रातिनिधिक संग्रह रसिकांच्या हातीं देतांना मला अतिशय आनंद वाटतो.

तरुण साहित्यिकांतील वाङ्मयीन प्रवृत्तीस बुद्धिपुरस्सर प्रोत्साहन देऊन त्यांच्या अंगी सातत्याने लेखन करण्याची आवड निर्माण करणं अत्यंत आवश्यक आहे. लेखकास योग्य मार्गदर्शन आणि त्यांच्या ललित कृतीस प्रसिद्धी यांचा लाभ झाला तर हा अंकुर, ही ' हिरवळ ' जपण्याचं आणि जोपासण्याचं मोठं कार्य होईल. ह्या काव्यसंग्रहाचं संपादन व प्रकाशन करतांना हीच दृष्टी मी ठेवली. कवितांत विविधता आणि अचूकता असावी व अधिकाधिक कवींच्या कवितांचा समावेश करता यावा यास्तव मी प्रयत्न केला. आशयांत यौवनसुलभ प्रीतिभावनेनं अधिराज्य गाजवणं अपरिहार्य, सहज होतं. कविकल्पना, काव्यात्म आविष्कार याकडे लक्ष देत असता सजावटीतील तंत्राचा बडेजाव मात्र मी ठेवला नाही. सहजशक्य असेल तेथेच प्रा. रा. वा. पाटील यांच्या मदतीने अक्षर किंवा मात्रा यांत बदल केले. निर्दोषतेच्या नावाखाली अवास्तव व अकारण बदल केले नाहीत.

प्रिं. महाजन, प्रा. पोतनीस, प्रा. अदवन्त यांनी या उपक्रमाचे स्वागत केले व सर्वप्रकारे सहाय्य केले. ही योजना साकार करतांना विद्यार्थी कविकवयित्रींनी तत्परतेने सहकार्य दिले याचा मला अभिमान वाटतो. श्री. र. धों. राजहंस यांनी खूपच मदत केली. त्यांनीच या संग्रहाचे सुंदर मुखपृष्ठ काढले आहे. हा संग्रह ' वैभव प्रकाशन ' पुणे तर्फे प्रसिद्ध करतांना प्रा. सुधाकर के. भोसले यांनी पुष्कळच जबाबदारी उचलली. या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे.

' हिरवळ ' मधील कवींची काव्यसृष्टी अधिकाधिक बहरावी, सुंदर व्हावी व रसिकप्रिय ठरावी अशी शुभेच्छा व्यक्त करून हे निवेदन संपवितो.

सु. का. जोशी



**माननीय प्राचार्य या. शि. महाजन यांस**
**सादर अर्पण**



अनुक्रम :


| | |
|---|---|
| ▣ शशिकांत भावसार | ९–१३ |
| ▣ कु. मंगला नाडकर्णी | १४–१८ |
| ▣ प्रमोद पाटणकर | १९–२३ |
| ▣ कु. शैला पवार | २४–२६ |
| ▣ र. धों. राजहंस | २७–३१ |
| ▣ कु. विद्या देशपांडे | ३२–३४ |
| ▣ प्रकाश पाटील | ३५–३६ |
| ▣ अ. बा. कुळकर्णी | ३७–४१ |
| ▣ बी. बी. पठाण | ४२–४३ |
| ▣ कु. रत्ना बावर | ४४–४६ |
| ▣ र. वि. पंडित | ४७ |
| ▣ रवींद्र मेढे | ४८–५१ |
| ▣ कु. भावना | ५२–५३ |
| ▣ श्री. मा. देशपांडे | ५४–५८ |
| ▣ एम्. एन्. अत्तरदे | ५९–६० |
| ▣ भीमराव पाटील | ६१–६३ |
| ▣ सुधाकर महाजन | ६४–६६ |
| ▣ कु. मीना सोमपूरकर | ६७–६८ |
| ▣ सुभाष पत्की | ६९ |
| ▣ विद्याधर पानट | ७०–७२ |

## सायंतारा

शशिकांत भावसार

क्र. 78606

उगवला शुभ्र सायंतारा.

क्षितिजावरती गोरज उडते
पक्षिणी-कुशीत अंडज दडते
चंचल लाटेला घेरतो कवेत किनारा.

किती रंगांचा नभांत संगम
कमालिनी संकोच हृदयंगम
धूसर शेतात पिकांना छेडितो वारा.

संध्येचे चरण दारी आले
ओले माझे डोळे झाले
आज कुठे कंकणनाद निरांजन लावणारा
उगवला शुभ्र सायंतारा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ..................

## वरिवरि हसलीस

शशिकांत भावसार

वरिवरि हसलिस हसविलेस तूं
मनांत सखी रडलीस परंतु.

आलो मी, क्षणी फुलले फूल
चंचल झाले मंद पाऊल
समजुनि उमजुनी पडली भूल
नजर निरांजन उजळिलेस तूं.

पौर्णिमेची चंद्रिका आली
तवरुपे नवगृही प्रकटली
शुभ्र चंद्रिका पसरी लाली
स्वर्गांत मला फिरविलेस तूं.

निघता मी, व्याकुळली हरिणी
ओठी हासू, आसू नयनीं
निरोप हा ? हस ! मी तव मनीं
सदैव मी तुझा माझीच तूं.

वरिवरि हसलिस हसविलेस तूं
मनांत सखी रडलीस परंतु.

# माझ्या मनाच्या कबुतरा

शशिकांत भावसार

माझ्या मनाच्या कबुतरा !
सप्त जगाच्या मुशाफिरा !
सप्त रंगाचे पर तुला
सरस्वतीचे स्वर तुला
सप्त नभाचा फेर तुला
न्याराच रे तुझा तोरा.

तूं अनंताचा प्रवासी
मोदगीते आळवीसी
गीतनादे डोलविसी
तूं ओतणारा सुधाधारा.

धुंदी तुज निळ्या नभाची
ऊब तुज पाटल सवित्याची
साथ धूमकेतु जवाची
तोड कारा जा भरारा.

रणरणत्या निदाघ समयी
तूं खुपसून कट्यार हृदयी
भूवेदना घेत जाई
मस्तवाल तूं दिगंतरा.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नों दि ....................

# विसरेन सखी मी

शशिकांत भावसार

तुझ्या शब्दांना भावांना आसवांना
स्पर्शातीत सुखाच्या नाजूक कल्पनांना
कुसुम सुकता गंध विरे निर्माल्यांत तसा
विसरेन सखि मी तूं म्हणशील तर त्यांना !

शब्द...ज्यांनी मुकीच छेडिली आंतरवीणा
भाव...सदाच जे राहिले ओले जशी रसना
आसूं...ज्यांना कुकल्पनाही असह्य वाटली
विसरेन सखि मी तूं म्हणशील तर त्यांना !

रक्ताळेल ऊर, जुळले धागे उकलतांना
उन्मळेल वृक्षहि वीज चमकून सरतांना
निरर्थक वातहि तुझ्या स्नेहाविण जीवनीं
विसरेन सखि मी तूं म्हणशील तर त्यांना !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................................. दि: ..................
क्रमांक ................................ नों दि: ..................

# आसू

शशिकांत भावसार

गाता गाता प्रीति-गीत
आसवांशी जडली प्रीत.

आसू–नाही कधी घनसंभव
आसू नाहीच कुणाचा गौरव
हे सदाचेच विपरीत
आसवांशी जडली प्रीत.

हे आसू कधी हसती कधी रुसती
हे आसू कधी फसती फसूनिही गाती
प्रीतीचे उत्कट गीत
आसवांशी जडली प्रीत.

आसू म्हणजे नाही बाजार-हाट
किलबिल पक्षांची नाही ती पहाट
एकान्त विश्व भुषवित
आसवांशी जडली प्रीत.

मुक्या मनाची वाचाळता...आसू
कोंडल्या भावांची मुक्तता...आसू
वेदना अथांगवीत
आसवांशी जडली प्रीत.

आकाश--डोळ्यातून टपकणारा
आसवांचा एक बिंदू ही धरा
ही गहिरी ओली प्रीत
आसवांशी जडली प्रीत.

# गुपित

कु. मंगला नाडकर्णी

कधी तुला समजेल का
वेड्या मनाची व्यथा ?
छे ! तुला कशी समजेल !
उन्हाला का चांदण्याचे जळणे समजते ?

कधी तुला उमजेल का
माझ्या प्रीतीची अबोलता ?
छे ! तुला कशी उमजेल !
पुष्पाला का कलिकेचे हृद्‌गत उमजते ?

कधी तुला कळेल का
एका मनाचे मधुर गुज ?
छे ! तुला कसे कळेल !
नक्षत्राचे निःशब्द गान का चंद्राला कळते ?

कधी तुला आठवेल का
माझी जखमी नजर ?
छे ! तुला कशी आठवेल !
पारध्याला का विद्ध हरिणीची नजर आठवते ?

# सांज

कु. मंगला नाडकर्णी

सांज आहे ओलावलेली
पापणीत रेंगाळणारी
आरस्पानी तळ्यामध्ये पाहून काजळ रेखणारी.

सांज आहे जडावलेली
किंचित् भुवई उंचावलेली
मऊशार हातावर लालचुटूक मेंदी रंगवणारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों. दि ....................

# केव्हांतरी

कु. मंगला नाडकर्णी

केव्हांतरी क्षितिज वाटते
उगाचच व्याकुळलेले
केव्हांतरी चांदणी वाटते
उगाचच हुरहुरणारी
केव्हांतरी पाऊलवाट वाटते
उगाचच झुरणारी
आणि केव्हांतरी
तुझ्या पापण्या वाटतात...
उगाचच मृदुल स्वप्नामध्ये भिजलेल्या.

# एक क्षण

कु. मंगला नाडकर्णी

एक क्षण...
शब्दात भावना नसते
कटाक्षात तेज नसते
बोलण्यात नेहमी उसळणारी उत्कटता नसते
विचारात रेशमी कल्पनांची गुंफण नसते.

एक क्षण...
काळ्या ढगाला रुपेरी कडा नसते
थरथरणाऱ्या तरंगात सूक्ष्म कातरता नसते
आकाश मिठीत घेण्याची मनामध्ये आस नसते
जुईसारखी सर्वांगाने फुलून येण्यची ओढ नसते.

एक क्षण...
उल्केसारखा झरकन् तुटून पडण्याचा आवेग नसतो
पानापानाआडून लाजरा भाव उमलत नसतो
क्षितीजाच्या ओठातून लाडिक हास्य फुटत नसते
अनुपम सृष्टीसौंदर्यांत रमूनही
कमलपत्रासारखा अलिप्त राहण्याचा तो क्षण असतो.

# एकटी

कु. मंगला नाडकर्णी

अंतरीच्या आगीमध्ये
एकटीनेच का तळमळायचे असते
सोनसळी उन्हाच्या धारांत
एकटीनेच का भिजायचे असते
शांत, विश्रब्ध कातरवेळी
एकटीनेच का झुरायचे असते
खडीसाखरी चांदण्यांत
एकटीनेच का गुंगायचे असते
गुलमोहराचे अंगारी वैभव
एकटीनेच का पहायचे असते
विषाचा पेला
एकट्या ' मीरे ' नेच का प्राशन करायचा असतो
विरहणीच्या वेषात
एकट्या ' उर्मिले 'नेच का रहायचे असते
स्वाभिमानाच्या यज्ञांत
एकट्या ' सती 'नेच का जळायचे असते
प्रेमाच्या, वासनेच्या, भावनेच्या उधाळल्या सागरात
एकट्या स्त्रीनेच का सर्वस्वाचे समर्पण करायचे असते !

## कुणीतरी तूं !

प्रमोद पाटणकर

कुणीतरी तूं
कुठल्याशा रंगांत
खुलून दिसलीस
अगदी संध्येसारखी !

कुणीतरी तूं
कुठल्याशा दृश्यांत
उमलून आलीस
अगदी फुलासारखी !

कुणीतरी तूं
कुठल्याशा लयींत
मावळून गेलीस
अगदी रागिणीसारखी !

## चाहूल

प्रमोद पाटणकर

छेडू किती भावराग
शब्द वाटती अबोल
शोधू किती प्रीतिगंध
होत व्यथा व्याकूळ !

पाहू किती स्वप्न-साज
थरथरते आज ज्योत
अजूनि कशी येईना
सांग तुझी चाहूल !

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम.................... दि: ....................
क्रमांक .................... कॉ दि ....................

## पावसाच्या सरींत

प्रमोद पाटणकर

पावसाच्या सरींत
गंधवेडी आठवण
शहारतो परिसर
मनीं दाटे हुरहूर.

भावनांच्या कवेंत
स्वप्नवेडे काही क्षण
आता हुंदका बेसूर
हृदीं उफाळे काहूर.

नयनांच्या पंखांत
भावमुग्ध काही सूर
परि रंग तो धूसर
नच कधी खुलणार !

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 78606

# भेटणार राया !

प्रमोद पाटणकर

लाजलेल्या वाऱ्याला
केतकीचा गंध
नभीं उभी चंद्रकोर
होऊनिया धुंद.

अवेळीच आला
पारिजातासि बहर
हळुवार चाहूलीने
थरारतो ऊर.

वाट ही बेहोषली
आसुसले नेत्र
मीलनाच्या स्वप्नाने
सरे सारी भ्रांत.

उमलती प्रीत ही
लागतसे गाणे गाया
भेटणार बाई ग
कुठेतरी राया !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... वि: ....................
क्रमांक .......................... नों दि: ....................

# व्यथा

प्रमोद पाटणकर

अफाटल्या क्षितिजाशी
ही वाट पहा सरली
खेळत आठवणींशी
तीं स्वप्नेंच की उरली !

भारावले मन हे
पाणावले ग डोळे
कोठवरी धुंडावे ?
अंधारले विश्व हे.

शून्यात लोपले ते
नाद गत-कालाचे
कोठवरी फिरावे ?
उजाड मार्ग सारे.

नाही सांज हसायची
उषा न आता यायची
कशी कळेल तुजला
व्यथा एकलेपणाची ?

# मुखवटा

कु. शैला पवार

असेच जात आहेत दिवसामागून दिवस
काळाच्या खपल्या बसत आहेत
मनाच्या जखमेवर...
अन् खपलीआड दडल्या आहेत
तुझ्या आठवणी
तुझे भावदर्शी डोळे
लाघवी स्मितहास्य
अन् ती जीव घेणी ताटातूट ! पण...
कधी कधी येतात उफाळून भावना
फसफसणाऱ्या सोडा वॉटरसारख्या...
आगीचा उठतो डोंब
आणि वेदनांचा कल्लोळ... वाटते...
जगाला काढावे होरपळून
बेचिराख करावी सारी सृष्टी
अशाच बेफाम विचारांत
शमवते मी मनाची वेदना...
अन् हसऱ्या मुखवट्यानें
हळूच कागद पुढे ओढून
लिहिते मी,
" माझं सारं ठीक आहे
तुमची खुशाली जरूर कळवा. "

## तहान

कु. शैला पवार

पुन्हा एकदा जाणून बुजून
काढली होतीस कुरळी बट
करताच बोटांनी माझ्या चाळा
निसटलं होतं हांसू तुझं
चमकत्या पाऱ्याप्रमाणे !
सामोरी बसली होतीस
थांबली होतीस बोलता बोलता...
अन् दिसलो होतो माझा मीच
डोळ्यात तुझ्याच डुलतांना !
पण माहीत नव्हती मला
तुझ्या हास्यांतील पाऱ्याची चंचलता
अन् जाणीवही नव्हती
तुझ्या क्षणिक खळाळत्या प्रेमाची !
आजही तडफडतो आहे
माशाप्रमाणे...
एकाच थेंबासाठी—प्रेमजलाच्या
पण शुष्क झालेल्या सरितेला
आता कसा पूर यायचा ?

# वसंत

कु. शैला पवार

सळसळ पिवळ्या पानांची
आठव तुझ्या हितगुजाचा
कोवळे ऊन संध्यासमयी
तुझाच विळखा हळूवार तो.
पिसाट वारा सुटलाय् हा
मिश्किल खोडकर तूंच जणूं
पाहत असता सगळं हें
मन बनलंय् हलकं पीस
ढगावरून तरंगत तरंगत
सांगतंय् तुझ्या कुशीत येऊन,
'वसंत आलाय् पहा जरा
माझीही कळी खुलव जरा !'

# सौख्य

र. धों. राजहंस

सूर्य डोक्यावर, भाजतात पाय
तरी रस्त्याने चालली सितामाय
शिरी भरली टोपली शिदोरीची
श्रांत चेहेऱ्यावर झळक तृप्ततेची.

'शिवा' मोठा नांगरावरि असेल
चिंच 'जगु'ची, अन्यत्र तो नसेल
कारभारी पाहून थंड छाया
गात बसले असतील श्लोक, ओव्या.

असा सौख्याचा संसार सिताईचा
जसा गरिबीचा तसा शान्ततेचा
एक छोटेसे शेत तिचे छान
कष्ट केल्या मग सुखां काय वाण!

बघुनि आईस हळि घातली जगूने
'भाऊ, बाबा थांबवा तुम्ही कामे'
बसुनि चौघांनी सोडली शिदोरी
भाजिभाकर परि आगळी खुमारी.

नेत्र अश्रूंनी दाटले सिताईचे
रूप तिजला आठवे विठाईचे
हात जोडुनि म्हणे, 'तूच असे त्राता
सुखदु:खाची नसे आम्हा चिंता.'

## लगीन

र. धों. राजहंस

सदापाटलाच्या लेकीचं लगीन
थाट तुम्ही राव काय पुसता मंगन
मोठा मांडव घातला, सारा गाव ये कामाला
सारी लुगडे नेशीसनी मिरवती वऱ्हाडनी
ज्याची त्याची गडबड, फुरसत ना घडीभर.

कोनी धुंडे बाजेवाले, कोनी भटजीशी बोले
कोनी आथरतो झोरे, आले आले हारतुरे
पाटील-पाटलीणीला जसा चक्कर पायाला
कोनी म्हने, ‘ वाईच टेका ’; पाटील म्हने, ‘ धूत लेका ’
तिथे नवरी बसली, जशी गौराई सजली.

आली आली रे वरात बँड वाजला सुरांत
लोक सामोरे धावले व्याही मोठे मानावाले
सगळा मांडव भरला, ‘ मामा आंतरपाट धरा ’
भटजीबुवा मंत्र बोले नवरानवरी मनीं डोले
अशी टाळी ती लागली डोळा डोळाभेट झाली.

पानसुपारीबी झाली अत्तराची टेस न्यारी
समदे सदा पाटलाला म्हने, ‘ मानूसच भला
नाही कशाचं रे उणं पाटलाचा हाच गूण
मोठ्या घरी गेली पोर त्याची हाटली फिकीर ’
पुसले डोळे पाटलान थोडा आडोसा पाहून !

# नातं

र. धों. राजहंस

बाल्यांत खेळलो मी जीसवे खेळ भातुकली
मी नवरा, ती नवरी ऐसी करूनी नाटुकली
निष्पाप बालमन अमुचे, थोरही कौतुके बघती
जे सत्य नसे तेथेची लोक हे जीव रमविती.

परि झालो मोठा जेव्हा तेव्हाही वाटे ऐसे
जो खेळ खेळलो होतो का घडेल कधितरी तैसे ?
ती वेडी आशा माझी राहिली अजुनही आशा
ती भातुकलीतिल नवरी अडकली दुज्याच्या पाशा.

अन् फिरुनी परवा दिसली तिजसवे एक छकुलाही
मी अवाक् होऊनी पाहे तैसीच गोंधळे तीही
परि आजाण बालक ते निष्पापहास्य हळु हसले
' मामा ' म्हणून माझ्या बाहूत झेपावले...

जे पवित्र नाते अमुचे निर्माण जाहले होते
त्या पवित्र बालमनाने आम्हास दाविले होते !

# पांढरपेशी विरामचिन्हें

र. धों. राजहंस

जेव्हा कारकुनी करुन बरवी खोलीहि मी शोधिली
फेऱ्या घालिती भोवती वधुपिते ' सांगून ' येती मुली
एकीला बघुनी जरी चिटत मी दूजीस अर्पी मन
आशा ' स्वल्पच ' होत की घडतसे हुंड्याहुनी भांडण.

ही रंगास कशी, कसे कुल, कुण्या प्रांतांत ही राहते ?
बोला ती शिकली किती कि नुसती ऐटींत वा राहते
ऐशा या विविधप्रकार वधुंना मत्सोयरे पाहत
तेव्हा झोप उडोनी जीवन दिसे जै ' प्रश्नचिन्हांकित '.

अर्धांगी नटुनी जशी कुलवधू येई अखेरीं घरीं
अर्पी मी मम सर्व कांही तिजला घेवोनि डोक्यावरी
रोज प्रातःकालीं चहा मधुर जो भ्रुभंगही लाजरा
' उद्गारा ' मग काढितो सहजची ' वाः मी भला नोवरा ! '
झालें व्यापक ते कुटुंब पुढती चंदू, शशी, रेवती
आणि त्यांत भरीस भार पुरती ये त्यांची ती मावशी
साड्या, कापड, दूध, पिक्चर कधी पैसा इथे संपत
पैशाचे बिघडे ' बजेट ' बघुनी मी होय 'अर्ध'मृत.

आशा प्रेम नि ऑफिसांत बढती यांचा उरे मोह ना
तोही मी ढकलीतसे शकट हा याला कधी शांति ना
माझा मात्र भविष्यकाळ मजला वाटे बरा पाहतां
पुत्रा ' थोर ' करीन तोंवरि कशी लाभेल ती ' पूर्ण ' ता.

( कल्पना–गोविंदाग्रजकृत 'विरामचिन्हें' )

# सैनिका !

र. धों. राजहंस

भारतभूच्या शूर सैनिका, स्वातंत्र्याच्या वीर पाईका
करि शौर्याची सीमा आज पावित्र्याची राखी लाज
कुरुक्षेत्रीची विशाल शक्ती सत्यापाठी असे खडी ती
नवल पुन्हाही घडेल ते स्वातंत्र्यरणीं जे घडले होते.

जनतेचे रे प्रेम तुझ्यावर अन् देशाची भिस्त तुझ्यावर
पेलायाला इतुका भार उत्साहाने होई तयार
तुला वारसा प्रशुरामाचा सत्वशील त्या युधिष्ठिराचा
शिवबाजीचा मराठबाणा स्वदेशप्रेमी प्रतापराणा.

बिजली ऐसी झाशीवाली स्वांतत्र्याची ज्योत पेटली
'स्वराज्य' हक्का घोषित केले लोकमान्य ते धन्य जाहले
सावरकर अन् सुभाषबाबू म्हण 'तयांचे चेले शोभू'
वीर जवाहर अन् गांधीजी यांची वाणी हृदयामाजी.

शूर सैनिका अता पुढारा उत्साहाने जाई निडरा
असत्याच्या निर्दलनास्तव शस्त्र करीचे पाजव, चालव
जिंकून ये तूं येशीलच रे विजयोत्सवा सज्जच, सारे
स्वर्गी किंवा ऐक भूवरी तुझ्या गुणांची गाथा न्यारी.

# चित्र

कु. विद्या देशपांडे

नभाकडे झुकणारा
आम्रवृक्ष उभा ताठ
गवताच्या शय्येपाशी
शांत राही सदा काठ.

मानवांची खळबळ
येई त्याच्या नित्य कानीं
शब्दातीत वेदनेत
जळतसे परि मनीं.

वज्रवेधी झंझावात
देई त्याला घट्ट मिठी
झुलतांना असा परी
कधी ढळली ना दिठी.

जगालाही तोंड देत
राखी तोच एक बूज
परि कोणीहि हेरेना
त्याच्या अंतरीचे गूज.

# स्त्रीहट्ट

कु. विद्या देशपांडे

सत्यभामा करी प्राजक्त–मागणी
स्वर्गीचा वृक्ष कृष्ण भूवर आणी.

राणीच्या प्रांगणीं लावियला वृक्ष
रुक्मिणीच्या अंगणी पडते पुष्प.

धूर्त कृष्णाने एक योजिली युक्ती
परीक्षाया पत्नीची प्रीति नि भक्ती.

केली सुवर्णतुला, मोजिलें सोनें
भामेच्या प्रीतीत आढळलें उणें.

सीतेने सोनेरी हरीण पाहिले
रामरायें त्यास्तव धावणे केले.

नाजुक सीतेला रावण पळवी
लंकेत नेऊन बंदिस्त ठेवी.

स्त्रियांचा स्वभाव कसा हो हट्टी
नेमकी सापडे दुर्धर संकटी !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि ....................

## पराभव

कु. विद्या देशपांडे

आभाळी मांडिला निशेने पट
मादक फुलें आली खेळाया ऐटींत.

सख्यांसह खेळाया तारका आल्या
सावधपणे डाव सावरू लागल्या.

परीक्षक रजनीकांतही झाला
मोठ्या हुशारीने निरखू लागला.

शुभ्र चांदण्या, गर्विष्ठ फुलें ती
स्वप्नाळूपणाने डाव खेळती.

प्रेक्षक म्हणून मेघही आले
आनंदें कडाड् करु लागले.

डाव जिंकला, चांदण्या हासल्या
रजनी-अंकी चमकू लागल्या.

हर्ष मावेना त्यांच्या मनांत
अमृत वर्षाव करीती सर्वत्र.

भूलोकीची फुलें पराजित झाली
गर्वहरण-दुखाने मिटून राहिली.

# प्रिये !

प्रकाश पाटील

रूप तुझे
मोहक सुंदर, सान मनोहर
केतकीपरी गौर अंगकांती
घालिते मोहिनी जणू अप्सराच
तू युवती, लावण्यवती.

शब्द तुझा
भावमधुर, अमृतरुचिर
प्रेमपाझर चंद्रमणी
प्रीतिवर्षाव मंगलपावन
लागते ओढ, हरिणापरी.

सहवास तुझा
हवाहवासा
जातो मी गुंगून
स्वप्नविश्रांत, रम्य सृष्टीत
विसरून तन मन, जगाचे बंधन.

प्रीतीचे पाश
चिरसहवास, हीच मनीं आस.

# प्रीतिलहरी

प्रकाश पाटील

कधीतरी, कसंतरी
मन जाई वेडावून
तनू जाई मोहरून
वाटे सारं स्वप्नापरी... नवथर प्रीतिलहरी.

नकळत केव्हांतरी
वाचू लागते हृदय
अर्धनारीनटेश्वर
रंगे सुखसागरीं... नवथर प्रीतिलहरी.

लावी ओढ कुणीतरी
वाटतसे हुरहूर
मनीं माजते काहूर
नयनांत अश्रूसरी... नवथर प्रीतिलहरी.

डोळा भेट, क्षणभरी
चंद्रमणी प्रेमवृष्टी
चकोरास लाभे तृप्ती
मन मोरपिसापरी... नवथर प्रीतिलहरी.

# आला श्रावण श्रावण

अ. बा. कुलकर्णी

ऊन पाऊस खेळती आकाशांत लपंडाव
आले राज्य उन्हावर लपे पावसाची सर
वेडा वारा त्यांच्यांतून उगा घालितो रिंगण
सोनियाच्या पावलांनी आला श्रावण श्रावण.

काळीसावळी धरती शालु नेसली हिरवा
अंगीं हिरवीच चोळी चुडा हातांत हिरवा
तृप्त धुंद स्मित येथे घेई ओठांत लोळण
उधळीत आनंदाला आला श्रावण श्रावण.

वाहणाऱ्या अश्रूंतून हासे स्वप्न सोनियाचे
ढगाळल्या जीवनांत क्षण श्रावण-भाग्याचे
माळामाळावर फुलें आनंदाचे पुष्पबन
खुलवीत कणकण आला श्रावण श्रावण.

# उजाड झाली बाग

अ. बा. कुलकर्णी

सुकल्या वेली गळली पाने
करपुनी गेल्या कळ्या उन्हाने
सोडित निःश्वसिते उदासवाणा
वायू आळवी राग,
' समृद्धीचे स्मशान झाले, सुखास लागे आग '
सख्या रे, उजाड झाली बाग.

पक्षी सारे गेले सोडुनी
स्मृतींत उरली त्यांची गाणी
वृक्ष नव्हे ही भुतेच केवळ
ग्रीष्म माजवी आग
रडे वेदना, येते जेव्हा पूर्व स्मृतींना जाग
सख्या रे, उजाड झाली बाग !

# गेलास सोडून कां ?

अ. बा. कुलकर्णी

अर्धी न वाट सरली
गेलास सोडुनी कां ?
रंगांत डाव येतां
उधळून तूं दिला कां ?
गेलास सोडुनी कां ?

अधुरेंच स्वप्न होते
अवचित जाग आली
उघडून नयन पाहे
भेसूर रात्र काळी
घरकूल मांडिलेलें
मोडून टाकिले कां ?
गेलास सोडुनी कां ?

कवटाळता तुला ही–
बहरून वेल आली
आकाश चुंबण्याला
ती उंच उंच गेली
अवचीत तूं असा रे
आधार तोडिला कां ?
गेलास सोडुनी कां ?

तूझ्या विना न माझे
अस्तित्व हे निराळे
तूं सोडूनिया जातां
शून्यांत विश्व विरले
कळवळूनी वेदना ही
तुज घालितसे हाका
गेलास सोडुनी कां ?
गेलास सोडुनी कां ?

# चिडून ऊठ रे मना !

अ. बा. कुलकर्णी

बाण लागता तुला रक्त ठिबकते पहा
आज विंधिले कुणी खेळ कसा जीवघेणा
चिडून ऊठ रे मना !

देऊनिया वचन कुणी केली तव वंचना
सोड तुझे भोळेपण अपमान हा साहीना
चिडून ऊठ रे मना !

खेळ समजुनी तुला खेळलें क्रुर कुणी
देहावर आज किती जखमांच्या खुणा खुणा
चिडून ऊठ रे मना !

सूड आज उगविण्या आज्ञा दे कणाकणां
एकांती अश्रू असे- ढाळू नको ऊठ ना
चिडून ऊठ, ऊठ मना !

## तुझे गीत गातो

अ. बा. कुलकर्णी

अंधारली रात्र काळी सागरांत नाव माझी
वल्हविता हात थकले डोळे भेटीसाठी शिणले
तोच दीपस्तंभ मला हळूच रे खुणावतो
तुझे गीत गातो,
आतां, तुझे गीत गातो.

जगाचा हा व्यर्थ पसारा जीवाचा या वीट आला
शृंगारांत धुंद डोळे आतां जाहले रे ओले
फडफडे जीवन-पक्षी शब्द ओठांत झुरतो
तुझे गीत गातो,
आतां, तुझे गीत गातो.

मदांत मी धुंद होतो विसरलो होतो तुला
मोहांत रे डुंबलेली होती माझी जीवनगाथा
कृपासागरा हा माथा तुझ्या चरणी ठेवितो
तुझे गीत गातो,
आतां, तुझे गीत गातो.

# नाही उणे कशाचे !

बी. बी. पठाण

व्यवहार–वन्ही जाचे दुःखें खडी अनंत
क्षणभरी ना उसंत.
विसरून विश्व दुःखी, आनंद शोधण्याचे
व्रत घेतले आम्ही हो ! नाही उणे कशाचे !

परमेश उदार असुचा, आधार तोच आमुचा
वर्षाव हो सुखाचा
आयुष्य वाढविती उद्गार सार्थ साचे.

वाटे हवेहवेसे, ते येई सर्व हाती
क्षण चांदण्यांत न्हाती
औदार्य येथ नांदे त्या विश्वचालकाचे.

आशा फुलूनि येई, बहरास येई बाग
स्वरधुंद होती राग
भर त्यांत अमृताची, वच सानुल्या मुखाचे
नाही उणे कशाचे !

# मी एक दीप आहे !

बी. बी. पठाण

नाही मी चंद्रासम सुंदर
नाही मी गगनाचे कंकण
नाही कुणाचा रूपदागिना
नाही मी प्रीतीचा दर्पण.

मानितो एक दीप आहे
तेजाळीत झिजतो आहे
मी न परि चंद्रासम
काजळ–रात्रीही जळतो आहे.

फक्त शारदीय चांदण्यांत
वैभव उधळणे येत नाही
अमावस्येच्या काळोखांत
मुख लपवणे येत नाही.

अश्रू–नीर पदरी आहे
स्नेह–ज्योत हृदयी आहे
विरहिणीसम जळत आहे
आरती जगास्तव समजूत राहे.

जहरास काळोखाच्या मी प्राशियले आहे
लाजेस प्रकाशाच्या मीच जागविले आहे
जन्मभरी जहर प्राशन करीत आलो आहे
चंदनापरी झिजत विश्व उजळत आलो आहे
मी एक दीप आहे !

# अबोला

कु. रत्ना बाबर

जातांना सांगितलेस
' विसरणार नाही तुला '
भेटल्यावर दाखवतेस
विसरलीस पूर्ण मला.
बोलतेस...पांघरून वेड
पण...तुझे डोळे
सांगतात वेडे !
अंतरंग मनीचे
उगाचच दुखवतांना
काही वाटले नाही तुला
आतां उमगताच मात्र
कां ग तरळले नयनीं तुझ्या
आकाशीचं पाणी ?
उमगे ना ! उमगे ना !

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों दि: ....................

# मृगजळ ?

कु. रत्ना बाबर

हो ! मी पाहिलं एक स्वप्न
स्वप्न नव्हे ! मृगजळ...
दूरदूरचं क्षितिजाकाठचं....ओढ लावणं
पिसाट वाऱ्यासारखी भिरभिर
धावले मागे...वेडावून
विसरून सारं काही...
आणि हाती आला–
आशा आकांक्षांचा फक्त पाचोळा
स्वैरभैर...स्वैरभैर
वादळांत भिरभिरणारा...पाठ फिरवा
परतले माघारी
आणि वाटले स्तब्ध शांत
होते जे हातीं
नव्हता तो पाचोळा
नव्हते ते मृगजळ
उगाचच भुलवणारे...फसवे
लाभले येथे
दोन घोट अमर तृप्तीचे
होते जे हाती
होते सत्य आणि सोने...फक्त माझे.

# आश्विनी नेत्र

कु. रत्ना बावर

तुझ्या आश्विनी नेत्रांत आहे
भाव लपंडावाचा
गाठेन त्यास...कधीतरी.

तुझ्या नाजुक ओठांत आहे
स्मित अवखळ
खुलवीन लोभस...कधीतरी.

तुझ्या कोमल मनांत आहे
भावनांचा रेशीम धागा
गुंफीन गोफ...कधीतरी.

माझ्या श्रावणी नेत्रांत आहे
तुझी प्रेममूर्ती
पूजा मी करीन...निरंतर !

र. वि. पंडित

देवदर्शना आतुर झालो !

विश्वविधात्या हे जगदीशा
देशिल दर्शन उत्कट आशा
तरीही पदरी अजून निराशा
आता पुरता मी बावरलो.

सर्वव्यापी तुज सारे म्हणती
अखंड महिमा तुझाच गाती
नानापरी जन तुलाच भजती
लीन तुझ्या मी चरणी आलो.

किमया ईशा तुझी आगळी
गोकुळीं भक्तसाठी गवळी
लीला करिशी रे वनमाळी
तुझ्या मुरलीने वेडा झालो.

तुझ्या मूर्तीचे सदैव पूजन
तुझ्या कीर्तीचे सदैव स्मरण
तुझ्यावाचुनि ध्यास अन्य न
कृपासिंधु तुजवरि विश्वसलो.

## खडक

रवींद्र मेढे

पेंगुळला आज वारा
कुंद जाहल्या दिशा
काळ्या कुट्ट ढगांशी
मिळे क्षितिजाची रेषा.
येणार आषाढ सरी
घामेजली तप्त भुई
वेडा निंब ' हुश्श ' करी
कुढतच सारे साही.
आणि नदीच्या काठाशी
थोडा दूर उभा मूक
पुरा भाजला ग्रीष्मांत
निर्विकार हा खडक.
कधी ना झाला धुंद
सरितेच्या सान्निध्यांत
कधी ऐकली ना त्याने
सरितेची हाक आर्त.
आजवरी उदासीन
मनी अखंड चिंतींत
सुख दुःख येणे जाणे
सदाचेच ब्रह्मांडांत.
आज तोही हुरहुरे
वेड्या निंबा साद घाली
येणार रे आषाढ सरी
तनु त्याची मोहरली.

## मलाहि जगावेसे वाटते

रवींद्र मेढे

मलाही जगावेसे वाटते
इथे समाजांत, माणसांत
तुझा माझा भावच नाही
अशा संपूर्ण आगळया विश्वांत--
अशा वेगळया निराळया विश्वांत
फुलावे सर्वांनी पुष्पापरी
काळजी भीति नसावी उद्याची
स्वैर भरारी विहंगापरी--
विहंगापरी स्वैर भरारी
दाणा टिपटिपत उडावे
जात, धर्माने ढगाळलेले
आकाश कधी पंथी नसावे--
खंत नसावी घरादाराची
ढोंग नसावे परि साधूचे
कोसळता पाऊस- सरी
बी पेरावे माणूसकीचे--
अंकुरता बी मानवतेचे
सर्वत्र मंगल पवित्र सुंदर
रूप मनोहर पाहून तारे
नांदाया येतील येथे भूवर--
जगावेसे वाटते आगळया जगांत
आशा माणसांत, अशा समाजात.

# काय दाखवू गाऊनी

रवींद्र मेढे

रसिका तुम्हां काय ते दाखवू गाऊनी
मनाचे दुःख कां मी दाखवू उकलुनी ?

उभे डोईवर आभाळ हे दुःखाचे
आसवांनी माखले बोल अंतरीचे
मनाला कळे संगिताचा तूं भुकेला
परि तार गेली सतारीची तुटोनी.

आवस–रात्री कसा रे चंद्र दिसावा ?
वाळवंटी कसा परि जलनिधी ठावा ?
प्रवासी एकटा वादळी दर्यावरी
आधारनौका तीच जावी बुडोनी.

तुम्हां असे आवडी गोड गोड सुमनांची
लाज वाटे असे झोळी ही कंटकांची
वेडा होतसे मी कसे समजावू तुम्हां
येती ओथावर ओघ दुःखाचे दाटुनी.

# तुझा सहवास

ग्रंथालय ... दा. क्र. 74206 ... शाखा (स्थळ ...)

रवींद्र मेढे

तुझा सहवास मला
वैशाखीं असे सावली
दुःखाच्या गिरीकंदरीं
अमृतखनी हाती आली.

दाहकल्या हृदयाला
गोड शीतल फुंकर
माझ्या कलल्या मंदिरा
फक्त तुझाच आधार.

दिलासा देई जिवाला
बोल खडीसाखरेचा
मिळे वाळवंटी मला
आधारच पाणोठ्याचा.

तुझ्या ग सहवासांत
मनीं नुरे काही व्यथा
कुणाला काय कळेल
विसावे स्वर्गीच माथा.

वादळी महासागरीं
तुझे माझे गडे तारु
आहे चारचौघापरी
हासत ग पार करु.

# व्यथा

कु. भावना

कशी कळावी तुला एका चांदणीची व्यथा ?
कशी कळावी तुला एका फुलाची कथा ?

कसे कळावे तुज एका निर्झराचे गान ?
नाही कधी ऐकली दुःखी पाखराची तान !

तूं असतेस सदा तारकांसवे खेळत
नाही तुझी अजून आसवांशी ओळख.

कशा कळाव्या तुज भावना वेड्या मनाच्या ?
भावना आहेत तुझ्या अथांग सागराच्या !

# वेडे मन

कु. भावना

अरे माझ्या वेड्या मना
कां रे असा धावतोसी ?
कधी जगताची रीत
वेड्या तुला कळायची !
ओढ तुला चांगल्याची
माया करिशी अपार
करिती ना पर्वा कोणी
टीका जनांची कठोर.
प्रेमवेड्या मनावर
जग भाळेना भाळेना
मूक रुदन तयाचे
कोणी पाहीना पाहीना.
साधु, सज्जन पाहून
उगा जाशी भारावून
होणे घायाळ घायाळ
माया कातेरी पाहून.
जगीं शहाणी प्रेमळ
संत माणसे दुर्मिळ
झुरतात विश्वासाठी
त्यांची उपेक्षा भोवती.
जाई वेडया त्यांच्यापाठी
हास खेळ त्यांच्यासाठी
होइ शहाणा शहाणा
जाण जगताचा बाणा.

# जीवन जीवन !

श्री. मा. देशपांडे

संध्येच्या त्या छाया सुंदर
लांब लांबल्या पूर्व दिशेला
अशीच झाली उदास जाणीव
दुःखित हळव्या या हृदयाला.
' व्यथेविना का जीवन असते ?
ज्वालेवाचून यज्ञ न ठावा
कशाला ज्योती झिजते जळते
जीवनातला अर्थ कळावा.'
विचार-कोषीं असा गुंतुनी
चालत होतो पायी एकटा
वळणावरती पुढे थांबलो
जिथे मिळाल्या कितीक वाटा.
सागर, उपवन, झाडे सांधित
वाटा होत्या धावत भवती
' कां ' नि ' कशा'चे प्रश्नकिनारे
धावत होते त्यांच्या पुढती.
होते मंदिर उभे एकले
चुकल्या पांथस्थाची आशा
' कां ' नि ' कसा ' या प्रश्नासाठी
दगडांनाही नव्हती भाषा.
असे पाहतां, कळले काही
वळले काही जुळले काही
' जीवन ! जीवन !! महान जीवन ! '
ते अर्थांच्या पलिकडलेही !

## कधी वाटते

श्री. मा. देशपांडे

आकाशीची गर्द निळी तनू
कधी वाटते अंगी ल्यावे
कधी वाटते फोफवणाऱ्या
मस्त कलंदर पवना प्यावे.

शरद चांदणे बनून यावे
अमृत विश्वावर सिंचावे
उघाण लाटांवर पुनवेला
कधी वाटते प्रेम करावे.

भयाण उदधी तुफान होता
वाटे तारक नौका व्हावे
दुःखि मनाच्या नयनामधले
अश्रु पुसावे, दुःख नुरावे.

सौंदर्याच्या पायातील परि
सदा वाटते पायल व्हावे
त्या झंकारी धरणी विरावी
मीही नुरावे...मीही नुरावे !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................... दि ....................
क्रमांक .................... नों दि ....................

# हिरवा श्रावण

श्री. मा. देशपांडे

श्रावण आला हर्ष जाहला धरणी-मातेला
भाऊबिजेला यावा भाऊ जैसा भगिनीला
आला श्रावण, नटली अवनी हिरव्या शालूने
रानें हिरवीं, पानें हिरवीं हिरव्या भेटीने.

वसुंधरेने नील नभीच्या सुंदर तबकांत
ठेवियला रवि, रक्त हासरा होउनि हर्षित
प्रभा फाकली क्षितिजावरती, सुवर्ण ती घटिका
हर्षित झाले सूर नभीचे पाहून त्या प्रतिका

श्रावण आला नटली राने हिरव्या पाचूने
सुवर्ण चाफा, गंध दाटला, पारिजात सुमनें
लता लाजरी चिंब जाहली अवखळ त्या सरीने
ओघळलेले मंगलमोती धरले धरणीने.

उषा सुंदर संध्या हसरी छेडिती रजनीला
' कुठे तुझा गे चंद्र गोजिरा ! ' श्रावण हा आला
वायूलहरी मुग्ध जाहल्या उंच उडाले खग
गाऊ लागले श्रावण महिमा डोलू लागले जग.

# सलतसे काटा

श्री. मा. देशपांडे

प्रशान्तशा वाटुलीला
सलतात पायठसे
अंतरीं सुखद सुखद
तव स्मृति-सुगंध वसे.

निरभ्र या आकाशाला
जड व्हावे घन मेघ
गोड आठवाने आज
वाढे अंतरीं आवेग.

चंद्र पाहून सागरीं
उफाळती स्वैर लाटा
माजे तुफान वादळ
उरीं जीवघेणी कळ.

येता सखये आठव
दुःख शोधतसे वाटा
अशा बेहोष स्मृतींचा
अंतरांत सले काटा.

# साथ तुझी दे !

श्री. मा. देशपांडे

कधी हर्षलो असेन मी तर
जीवनपथ हा दीर्घ तुडविता
मधु शब्दें कधी देत दिलासा
विसावला उरीं असेल माथा.

मानखंडना दीन म्हणूनी
जगतीं केली असेल कोणी
असेल पुशिले तूंच सखे ग
या नयनांतील दुःखी पाणी.

तूंच दाविली सखये मजला
प्रणयाची मधु छटा बावरी
त्यागमयीं ती उदात्त प्रीती
स्वर्गसुखाचे स्वप्न भरजरी.

तूंच म्हणालीस स्मरते मजला
तम–द्युतीचे जीवन जीवन !
साथ हवी तव अविरत मजला
दुखवू नको ग स्मृतींत लोपवून !

## तूं येता श्रावण हसतो

एम्. एन्. अत्तरदे

तूं येता श्रावण हसतो
तव हास्यांतून सहजच हृदयीं, स्वर्ग सखे फुलतो.

हसते खुलते दिगंत सगळे
श्रावणीं ऊनही होते ओले
तुजसवे जलधारांतून न्हाता, घट मधाचा भरतो.

द्विजगण करिती मंजुळ किलबिल
किन्नरकंठी वच तव कोमल
मधु हास्याच्या विविध छटांनी, इंद्रधनु रंगतो.

डोळे हिरवळ भूमीवरती
निळे जलद वर नभी विहरती
सजल दृष्टी ही माझ्यावरती, स्नेह जणुं पाझरतो,

ऊन-पाऊस खेळ श्रावणीं
तोच सखे ग माझ्या जीवनीं
तूं असतां श्रावण हसरा, नसतांना कां रडतो ?

प्रेमी युगुलें वनीं उपवनीं
तूंच अशी कां दूर साजणी
येई प्रिये हे बाहू पसरले, श्रावण वाया जातो.
तूं येता श्रावण हसतो !

# शिशिर

एम्. एन्. अत्तरदे

उदास चंद्र एकला, गोठला शिशिरही
वाट किती पाहू मी, ये न ती अजूनही ?
ये न ती अजूनही !

धरित्रीही उदासली, मिटुनि कळी पाकळी
उजाडल्या वृक्षवेली, स्तब्धलाच वायूही
ये न ती अजूनही !

मी एकला उभा इथे, जरठ वृक्ष साथ दे
शुष्क पर्ण साद दे, "थांब, वेड्या, वाट पाही"
ये न ती अजूनही !

फिकटलीच चंद्रज्योत, रक्तवर्ण ये प्रभात
परि ढळे न मध्यरात्र, अंतरीची अजूनही
ये न ती अजूनही !

मराठा ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नों दि: ................

## उषःकाल

भीमराव पाटील

सोनेरी किरणांनी
ये आकाशाला भरती
होतो पवनही धुंद
गाऊ लागते धरती.

सडा दवाबिंदूंचा
चिमुकल्या तृणांत
भरे पारिजाताचा
सुगंध कणाकणांत.

टपोरले गुलाब
पिंगा घालिती भृंग
किलबिलती मंजुळ
होती पाखरे दंग.

सुवर्णाने दिशा दाही
उषःकालीं उजळती
वसुंधरा होते वेडी
बने मूर्तिमंत प्रीती !

## सैनिका शस्त्र उचल

भीमराव पाटील

सैनिका शस्त्र उचल
रात्र गाठली वैऱ्याने, पेटला गिरी धवल
सैनिका शस्त्र उचल.

मातृभूमीच्या रक्षणाला
भिडवुनि खांदा खांद्याला
पुढेच आतां चल, सैनिका शस्त्र उचल.

घावामागुनी घाव पडतील
बर्फाचे वा कडे कोसळतील
एकवट बळ, पुढेच चल, सैनिका शस्त्र उचल.

' जयहिंद ' ही करूनी गर्जना
जाऊ अवघे रणांगणा
शत्रूची करण्या कत्तल, सैनिका शस्त्र उचल.

अभंग राखू सीमा उत्तर
आस एक ही मनांत प्रखर
लढू, उगवू दिन मंगल, सैनिका शस्त्र उचल.

रात्र गाठली वैऱ्याने, पेटला गिरी धवल
सैनिका शस्त्र उचल !

## येड्यागत—

भीमराव पाटील

वारी कार्तिकी धरून
लई दिसांनी क्येलं येन
आंघूळ म्या भागेमधीं
केली लई दिसातनं.

साधु संत वारकरी
गाती ' ग्यानोबा माऊली '
न्हान मोठा इसरूनी
ध्येती लोयन पाऊली.

कुनी आनलं सोनं
घेती कुनी तनमन
आलो देवा येड्यागत
माय फुलाची घेऊन.

भोया भाबडा भगत
मी न नामा, ना तुकाई
भेटे पंढरीस माले
माय माऊली विठाई.

माय माऊली विठाई
ध्येतो लोयन मी पायी.

## तुझी माझी प्रीत सदा

सुधाकर महाजन

तुझी माझी प्रीति सदा
नित्य अशीच असू दे
रात्र अंधारली तरी
दीप मनीं उजळू दे !

सये ! तुझी माझी प्रीति
स्वप्नातही दृढ व्हावी
तुझ्या माझ्या मनीं कधी
वृत्ती संशयी नसावी.

तुझी माझी प्रीति सदा
जगीं अक्षर ठरू दे
अमर या बंधनांत
सात जन्म गुंफू दे !

तुझी माझी प्रीति सदा
जन्मोजन्मीचीच अशी
तोडण्यास पाशबंध
साहस न काळापाशी.

मराठा ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........................ वि.
क्रमांक .............................

# ओढ

सुधाकर महाजन

दाटे काजळ काळोख
अंधारली काळरात्र
दोन बावऱ्या मनांत
प्रीतिप्रकाश सर्वत्र.

सारे विश्व निद्राधीन
चहूकडे स्तब्ध सुप्त
प्रीतिगीत गात गात
दोन जीव स्वप्नमग्न.

सारं कसं शांत शांत
वाहती ना वायुलहरी
अंतरांत तीव्र ओढ
अनावर अश्रूसरी.

नाही चैन क्षणाचीही
मनीं वादळ भयाण
ध्यानीं मनीं फक्त प्रीत
येत प्रीतीस उधाण.

जगीं नीरव शांतता
असे विश्व स्तब्ध शून्य
दोन मनांचे मीलन
रूप ईश्वरी लेऊन !

## नाते जुळले मनांत !

सुधाकर महाजन

हजारदा मनाला मी सांगितले ओरडून
तुझे तिचे नाते कधी
जुळणार नाही, जुळणार नाही.

हजारदा मला तेच, परत उत्तर आले
प्रेमाचा अंकुर आतां
जळणार नाही, जळणार नाही.

मनाच्या या भांडणाची खूप केली बोळवण
'समाज, धर्म, नीती' यांचे छातीवरि दडपण.

परि मन काही माझे हुकूम आतां मानीना
भूलथापा दमदाटी यांना बळीच पडेना.

उलट लागले तेच मला धडे शिकवायाला
प्रेमासाठी मेलेल्यांची अमरता वर्णायला.

दळभारे दबले कां? जननिंदेस भ्याले कां?
शक्तीपुढे प्रीतिव्रत कधी कुठे नमले कां?

ऐकून ते यक्ष प्रश्न घेत माघार... माघार
मनाच्या बेहोषीस दिला तात्काळ होकार.

वाटे निराळे निराळे, येई हिंमत मनांत
घेई निर्णय तेव्हांच नांते जुळले क्षणांत!

## प्रश्नचिन्ह

कु. मीना सोमपूरकर

तुझे डोळे
जाईची दोन फुलं
ओळखते आहे त्यांत
जादुगिरी भुलवणारी
आहे त्यांत.
शीतलता शुक्राची
गंभीरता सागरीची
नजरेंत तुझ्या
ओढ सख्या प्रीतीची.
उत्सुकता भेटीची
पाहतोस मजकडे
दृष्टी-आड होईतों
तरळतात सुंदर
इंद्रधनु भावरंग.
मी न परि पाहते
कळ उरांत दाबते
टाळते मोह हा
अजुनि उभे प्रश्नचिन्ह !
पटताच सख्या प्रीतिखूण
पाहीन तुज डोळे भरून
आश्वासन...आश्वासन !

# नशिब

कु. मीना सोमपूरकर

पाहता तुला उषे
आठवते चंद्रकोर
नील नभांतील नाजुक सुंदर
तूं तर सौजन्याची मूर्ति !

पाहता तुला उषे
आठवे ऋतु वसंत
धुंद तरूवर, कोकिल कूजन
तूं तर लावण्याची मूर्ति !

पाहता तुला उषे
आठवे तरु प्राजक्त
सडा श्रावणीं पोवळ-ओठी
तूं तर पावित्र्याची मूर्ति !

पाहता तुला उषे
आठवे उदात्त मंगल कांही
दैव न पाठी तुझ्या ग बाई
उदास जाणीव पोळत राही !

# आशेचा किरण

सुभाष पत्की

अंधार अंधार सर्वत्र अंधार
विश्वांत, नभांत जनांत, मनांत
महाभयंकर दारुण तिमिर !
देशसंरक्षण साधूंचे पोषण
दुष्टांचे दंडन धर्माचे रक्षण
विक्राळ हासती जीवघेणे प्रश्न
थिजले नयन बावरले मन
पथही दिसेना साथी गवसेना
वाटते निराश उदास हताश.
परि एक आशा देतसे दिलासा
संपेल ही निशा उगवेल उषा
रात्रीच्या गर्भात सुखाची पहाट !
काळोखांतच ना जन्मे नंदराणा !
धीर नि गंभीर बनतो शहाणा !
निश्चय प्रयत्न निर्मितील सुख
गाती चित्तवृत्ती विसरून दुःख
विश्वांत, नभांत जनांत, मनांत
सर्वत्र प्रकाश उजळेल विश्व.
पटतसे खूण जात आनंदून
येणार आनंद प्रयत्नांतून !
येणार प्रकाश अंधारांतून !
जन्मेल आनंद काळोखांतून !

# बिचारा !

विद्याधर पानट

कुणा एकाची रात्रीच्या अंधारीं
धगधगे चिता नदीच्या किनारीं.

विक्राळ हास्य जाळीत होते
मृत्यूच्या मुखाने असहाय जीवातें.

ओल्या डोळ्यांनी उभे आप्तगण
हृदयीं भग्नता अंतरीं विषण्ण.

कुणाचा पुत्र ? पिता कुणाचा ?
जीवाचा सोबती ? भाऊ कुणाचा ?

नित्याचा संघर्ष मानवाची हार
काळाचा विजय क्रुर कठोर.

दोन घटका थांबून
गेले अवघे निघून
चार पावले जाताच
कोणी पाहीना वळून.

नुरला प्रकाश रक्षा अवशेष
घुत्कारी घुबड साक्ष सोबतीस !

## भाग्यवती

विद्याधर पानट

रवीच्या प्रेमळ कोमल किरणीं
नाचते खेळते भान विसरूनी.
माय धरित्रीचा धरून पदर
कोवळी वेल ती घेतसे आकार.
पाहते भोवती सहज वळून
वृक्ष, तीरावर नजर रोखून.
लाजते कापते थरथरे ऊर ।
मनांत वेडीच्या माजते काहूर.
पाहे एकटक होत दृष्टिभेट
जीवनीं वेडीच्या येतसे वसंत.
भाग्य न वेलीचे नशिबीं न प्रीत
एकाकी एकली झुरते दुःखांत.
ग्रीष्माचा तडाखा जीवनीं वादळ
साहे ना संकट होतसे व्याकूळ.
वाहे झंझावात प्रहार करीत
उन्मळे कोसळे दैवा दोष देत.
कळे ना कुणास दैवाची किमया !
मृत्यूच्या मुखांत प्रकटते माया !
उघडी लोचन जाई आनंदून
जागृती की स्वप्न पडतसे प्रश्न.
ध्यानीं ये हळूच वृक्षाच्या बाहूंत
विशाल कुशींत विसावे सुखांत.

## प्रणाम वीरा !

विद्याधर पानट

धन्य वीरा तूं ! धन्य तव जीवन ! धन्य मरणही तुझे !
प्राण अर्पिले देशासाठी, अमर राहील नांव तुझे !

शिर तुटले, नाही झुकले, पान झळकले इतिहासाचे
प्राणांचे तूं मोल देऊनि, सत्व राखिले प्रिय मातेचे.

शूराचे तूं जगला जीवन, मरणही आले वीराचे
समरीं अपुला देह ठेवूनि, ऋण फेडिले देशाचे.

देह ज्या स्थळी ठेविलास तूं तीर्थाहून ते श्रेष्ठ ठरे
रक्त सांडिले राष्ट्रास्तव ते गंगेहुनीही पुनित खरे.

शपथ घेऊनि आश्वासितो तुज पूर्ण करीन मी तव काज
कोटी कोटी प्रणाम वीरा ! देशाची मी राखीन लाज.

REFBK-0014807
REFBK-0014807
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम.......................... वि: ......................
क्रमांक .......................... नों दि ......................
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. 98208